**नियमित दिवाणी कज्जा क्र.०९/२०१२ मधील नि.क्र.९१ वरील आदेश**

( पारीत दिनांक – २४/११/२०२२)

सौ. शकिला रमजना तब्बलजी वि. राजेंद्र भिमराव जाधव.

**CNR -MHKO130000502012**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला दिनांक १०/०१/२०१९ रोजीचा, दि. १३/०१/२०२२ व दि. २३/०३/२०२२ रोजीचा 'उलटतपास नाही' असा आदेश रद्द करुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ च्या कथनानुसार, प्रस्तुत कामी यातील प्रतिवादीतर्फे वादीचा दि. १०/०१/२०१९ तसेच वादीतर्फे साक्षीदार मोजणी अधिकारी यांचा दि. १३/०१/२०२२ रोजी व वादीतर्फे साक्षीदार निशाणी क्र. ८८ ला मोहन पांडूरंग पिष्टे यांचा दि. २३/०३/२०२२ रोजी उलटतपास घेतला नसल्याने 'उलटतपास नाही' असा आदेश पारित झाला आहे. सदरकामी प्रतिवादींनी वादी व त्यांचे इतर साक्षीदार यांचा उलटतपास मुद्दामहून घेतला नाही असे घडले नाही. प्रस्तुतचे काम वादी यांचा उलटतपास घेणेवर नेमले होते व त्याप्रमाणे उलटतपासही घेणेचा होता परंतु वादी व प्रतिवादीमध्ये आपसमजुतीची बोलणी सुरु होती त्यामुळे, प्रतिवादी हे आपापसात तडजोड होणार या समजुतीत राहिले त्यामुळे, प्रतिवादींना वकीलांना भेटून उलटतपासाकरीता आवश्यक ती माहिती देता आली नाही. तसेच, वादीतर्फे साक्षीदार क्र. २ मोजणी अधिकारी यांचे जबाबासाठी पुन्हा कोरोनाचे निर्बंध सुरु झाल्याने व प्रतिवादींच्या वकीलांच्या मुलीचे लग्न असल्यामुळे कोर्टात येवून उलटतपास घेता आलेला नाही, तसेच, वादीतर्फे साक्षीदार क्र. ३ मोहन पिष्टे यांचा उलटतपास न घेतल्याने उलटतपास नाही हा आदेश पारित केला आहे. सदरकामी प्रतिवादींनी मुद्दामहून उलटतपास घेतला नाही असे झाले नाही. वर नमुद कारणांमुळे प्रतिवादींना वेळेत वकीलांशी संपर्क साधून माहिती देता आली नाही. त्यामुळे, सदर साक्षीदारांचा उलटतपास घेता आलेला नाही. त्यामुळे, प्रतिवादी क्र. १ ते ३ विरुध्द 'उलटतपास नाही' असा आदेश पारित करणेत आला आहे. सबब, वरील कारणास्तव, त्यांच्याविरुध्द झालेला 'उलटतपास नाही' असा आदेश रद्द करण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. सदर अर्जावरती वादीने निशाणी क्र. ९२ वर त्यांचे म्हणणे दाखल केले असून त्यांनी अर्जातील संपूर्ण कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादींचा प्रस्तुतचा अर्ज चुकीचा, खोटा व लबाडीचा असून वादींना तो मान्य व कबूल नाही. याकामी निशाणी क्र. ५९ वर वादीचा सरतपास दि. २४/१०/२०१६ रोजी दाखल केला होता.

त्यानंतर, मे.कोर्टानी दि. ०७/०७/२०१७ रोजी वादीचे कागदपत्रांना निशाणी देवून काम वादीचे उलटतपासाकरीता नेमले होते. त्यानंतर, दि. १०/०१/२०१९ रोजी वादीचा 'उलटतपास नाही' असा आदेश झाला आहे. म्हणजेच, सदर आदेश कोरोना महामारीपूर्वीचा असलेने अर्जातील कारण चुकीचे आहे. त्यानंतर, वादीतर्फे साक्षीदार क्र. २ यांची साक्ष दि. १३/१२/२०२१ रोजी झालेली आहे. त्यानंतर, उलटतपासाकरीता तारीख देवूनही प्रतिवादींनी उलटतपास न घेतल्याने उलटतपास नाही असा आदेश झाला. त्यानंतर, वादीतर्फे साक्षीदार क्र. ३ यांची साक्ष नि. ८८ दि. २३/०३/२०२२ रोजी नोंदविलेली असून त्यांचा देखील उलटतपास न घेतल्याने उलटतपास नाही असा आदेश झालेला आहे. दि. २३/०३/२०२२ रोजी वादींनी पुरावा बंद केला व दि. ०१/०४/२०२२ रोजी प्रस्तुतचे काम प्रतिवादींचे पुराव्यावर ठेवलेचे रोजनाम्यावरुन दिसून येते. अशाप्रकारे, प्रतिवादींनी दि. १०/०१/२०१९ पासून पहिल्यांदा उलटतपास नाही असा हुकूम झालेनंतर वादींचे साक्षीदार होऊन पुरावा बंद केलेनंतर अशाप्रकारचा अर्ज दिला आहे. यावरुन प्रतिवादींचा निष्ळाळजीपण दिसून येतो. त्यामुळे, सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा तसेच मंजूर केला तर, प्रतिवादी यांना रक्कम रु. ५,०००/– इतका दंड करण्यात यावा अशी वादीची विनंती आहे.

**४.** उभय बाजूंच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

**५.** अभिलेखाचे अवलोकन करता, प्रस्तुत प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्याविरुध्द १०/०१/२०१९ रोजीचा, दि. १३/०१/२०२२ व दि. २३/०३/२०२२ रोजी 'उलटतपास नाही' असा आदेश पारित करण्यात आला आहे असे दिसून येते. तद्नंतर, दि. ०३/१०/२०२२ रोजी वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादींच्या अर्जातील कथने ही शपथेवरती आहेत. त्यामुळे, ती ग्राहय धरावी लागतील. नैसर्गिक न्याय तत्त्वाचा विचार करता, वादीचा व वादीतर्फे साक्षीदारांचा उलटतपास घेण्याची संधी प्रतिवादीस देणे योग्य राहील, तसे न झाल्यास नैसर्गिक न्याय तत्त्वाचे उल्लंघन होईल असे वाटते. निश्चितपणे, प्रस्तुत कामी सन २०१९ व तद्नंतर अन्य साक्षीदारांविरुध्द झालेला 'उलटतपास नाही' हा आदेश प्रतिवादी क्र. १ ते ३ हे रद्द करुन मागत आहेत. सदरच्या अर्जामुळे व प्रतिवादींच्या कृत्यामुळे दाव्याच्या कामी जो विलंब झाला, त्याकरीता काही रक्कम खर्च स्वरुपात प्रतिवादीवरती बसविणे योग्य राहील. सबब, वरील सर्व कारणास्तव खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र. ९१) प्रतिवादीने वादी यांना आज तारखेपासून

७ दिवसांच्या आत रक्कम रुपये ६००/– ही खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर प्रतिवादी क्र. १ ते ३ विरुध्द झालेला 'उलटतपास नाही' असा आदेश रद्द करण्यात येतो.

Amol Bharat Jawale
Digitally signed by Amol Bharat Jawale
Date: 2022.11.25 13:36:08 +0530

कागल. **(अमोल भारत जवळे)**

दिनांक – २४/११/२०२२ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.